# शिष्यवृत्ती शुक्रवार


**सादरकर्ता**

संगिता गुरुदास कामडी

विषय साधनव्यक्ती, चंद्रपूर


**प्रेरणा**

मा. श्री. धनंजय चापले

प्राचार्य

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था चंद्रपूर

**मार्गदर्शक**

मा. श्री. विनोद लवांडे

अधिव्याख्याता

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था चंद्रपूर


जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था चंद्रपूर

**शैक्षणिक वर्ष – 2021 - 22**

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 3 - 5 |
| 2 | नवोपक्रमाची माझी गरज | 5 - 6 |
| 3 | नवोपक्रमाची माझी उद्दीष्टे | 7 |
| 4 | व्याप्ती व मर्यादा | 8 |
| 5 | नवोपक्रमाचे नियोजन | 8 - 11 |
| 6 | नवोपक्रमाची कार्यपद्धती | 11 - 16 |
| 7 | नवोपक्रमाची फलनिष्पत्ती | 16 - 17 |
| 8 | समारोप | 18 -19 |
| 9 | संदर्भसूची | 20 |
| 10 | परिशिष्टे | 21 - 31 |

## नवोपक्रमाचे शीर्षक

## शिष्यवृत्ती शुक्रवार

**प्रस्तावना –**

सध्या कोविड 19 मुळे संपूर्ण जगाची जीवनशैली बदलली आहे. त्यामुळे शाळा बंद झाल्याच, पण शिक्षण सुरु ठेवणे अतिशय गरजेचे ठरले. सन 2015 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने सर्व मानवजातीच्या कल्याणासाठी 17 शाश्वत विकासाच्या ध्येयापैकी ध्येय क्रमांक 4 – गुणवत्तापूर्ण शिक्षण (Quality Education) आपणा सर्वांसाठी खूप महत्त्वाचे ठरले आहे. सद्य परिस्थितीमुळे प्रत्यक्ष वर्गातील अध्ययन अध्यापनाची अंमलबजावणी शक्य नव्हती ; परंतु अध्ययन अध्यापन प्रक्रिया सहज, सोपी करण्यासाठी व दर्जेदार शिक्षणाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी आपल्याला एकविसाव्या शतकातील कौशल्ये माहित असणे आवश्यक आहे. यापैकी सर्जनशील विचार, चिकित्सक विचार, सहयोग आणि संप्रेषण इ. कौशल्ये शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या माध्यमांद्वारे सहज साध्य करता येतात.

2020 – 21 चे सत्र सुरु झाले. पण अद्यापही शाळा सुरु होण्याचे संकेत मिळत नव्हते. सगळीकडे कोरोनाची महामारी सुरूच होती. हा – हा म्हणता प्रत्येक खेडोपाडी कोरोना येऊन पोहोचला. सुरुवातीला कोरोनापेक्षा जीव महत्त्वाचा म्हणून शाळा बंद झाल्या, शिक्षण थांबले, शिक्षकही स्थिरावले. कोरोनाचे संकट सहजासहजी जाणार नाही, याची मनाला खात्री होती. तेव्हा येत्या शैक्षणिक वर्षात इयत्ता 5 वी व 8 वीतील शिष्यवृत्ती परीक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान कसे टाळणार, याविषयी मनात विचार येऊ लागला.विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव, विद्यार्थ्यांची गुणवत्ता हे मोठे आव्हान माझ्यासमोर होते. कोरोनाचे महापर्व काही लवकर संपणार नाही, असे वाटू लागले. तेव्हा आपण कशा पद्धतीने विद्यार्थ्यांचा सराव सुरु ठेऊ शकतो? या विचाराने मनात काहूर माजवले आणि work from home करीत असतानाच नवीन कल्पनेला उधाण आले.

शाळा बंद असल्या तरी शिक्षण थांबवता येणार नाही, विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात ठेवणे अत्यावश्यक आहे, यासाठी सर्वांकडे उपलब्ध असलेल्या mobile technology चा वापर आपल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी करता येईल, असा विचार दृढ झाला....... आणि या

निश्चायातूनच 'शिष्यवृत्ती शुक्रवार' या नवोपक्रमाने जन्म घेतला. या नवोपक्रमाने कोरोना महामारीतही इयत्ता 5 वी व 8 वी च्या वर्गातील विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा प्रवाह अखंड वाहता ठेवावा, विद्यार्थ्यांची गुणवत्ता टिकवून ठेवावी असा विचार पक्का झाला. इयत्ता 5 वी व 8 वी शिष्यवृत्ती परीक्षेकरिता मराठी, गणित, बुद्धीमत्ता चाचणी व इंग्रजी या चार विषयांची तयारी करावी लागते. Android mobile वर शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव या नवोपक्रमातून होणार होता, पण हे चारही विषय एकावेळेस घेण्यास अडचण वाटत होती. म्हणून मी गणित विषयाच्या सरावापासून सुरुवात केली.

गणित हा विषय शालेय स्तरावर अनिवार्य आहे. माणसाच्या बौद्धिक व मानसिक क्षमतांच्या विकासात गणित विषयाचा सर्वाधिक उपयोग होतो, हे शिक्षणतज्ज्ञांनी व मानसशास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. गणिताचे अध्ययन ही शैक्षणिक प्रक्रियेतील अतिशय महत्त्वाची बाब आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रात गणित अनिवार्य ठरते. त्यामुळे प्राथमिक शिक्षणापासूनच विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची आवड निर्माण करणे आणि सहजरित्या आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. समाजासाठी आस्था असणा-या, विचार करणा-या चिंतनशील व्यक्ती तयार करण्यासाठी शालेय स्तरावर गणित शिक्षण बहुमोल ठरते. पण कित्येकांना वाटते की गणितामुळे मुलांच्या मनात भीती आणि ताणतणाव निर्माण होतो. यामागचे कारण शोधले असता मागील सत्रातील शाळाभेटीत पाठ निरीक्षण केल्यावर तसेच मुलांशी चर्चा केल्यावर असे लक्षात आले होते की, गणित शिकविण्याच्या पद्धतीत अडचणी आहेत. मलांची गणिती क्षमता व कौशल्ये विकसित झालेली नाहीत. मुले फक्त गणिते सोडवितात म्हणजेच उत्तरे काढण्याकडे कल आढळला. का व कसे हे प्रश्न विचारले तर मुलांना सांगता आले नाही. तर्कशुद्ध ज्ञानाचा अभाव आढळला. तसेच आव्हानात्मक उदाहरणे दिली तर मुलांना सोडविता आले नाही. यामागचे कारण शोधले असता मुलांना शाब्दिक उदाहरण ओळखता येत नव्हते, कोणती क्रिया करायची व का करायची हेही कळत नव्हते, तसेच तर्क व अनुमान काढता आले नाही इ. बाबी आढळल्या.

तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत मागील निकाल पाहता असे निदर्शनात आले होते की, मुलांना पेपर 1 पेक्षा पेपर 2 मध्ये गुण अधिक मिळतात. याबाबत आधीच्या सत्रातील परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांशी चर्चा केली असता त्यांनी गणित विषयामुळे गुण कमी मिळाल्याचे सांगितले. त्यामुळे मला ही समस्या दूर करण्यासाठी गणित विषयाची तयारी करून घेण्याच्या दृष्टीने हा नवोपक्रम राबवणे अत्यावश्यक वाटले.

सदर नवोपक्रमाकरिता मी पंचायत समिती चंद्रपूर अंतर्गत मराठी माध्यमाच्या ग्रामीण व महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता 5 वी व 8 वी चे वर्ग असलेल्या शाळातील विद्यार्थ्यांच्या गणित विषयातील मूलभूत संबोध अधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न तसेच शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी या नवोपक्रमातून करण्यात आलेली आहे.

**नवोपक्रमाची गरज व महत्त्व –**

शैक्षणिक वर्ष 2020 , कोव्हिड – 19 चा जणू शाप घेऊनच आलेले वर्ष. कोव्हिड – 19 विषाणू जगावर अधिराज्य गाजवत होता. मृत्यूचे जणू काही तांडवच चालले होते, सगळीकडे हाहाकार माजला होता. विद्यार्थी शाळेपासून दूर गेले होते. शाळारूपी माउलीच्या प्रांगणातले ज्ञानकण उचलण्यासाठी आतुर झालेली पाखरे तिच्यापासून दुरावली होती. परंतु कधी कधी संकटच संधी निर्माण करतात. नियती एक दार बंद करते, तेव्हा दुसरे दार उघडते.

1) **उपक्रम निवडण्याचे कारण** –

कोरोनाचे सावट संपूर्ण जगभर पसरले होते. कोरोनामुळे शाळा बंद झाल्या होत्या. सन 2020-21 च्या सत्राला 25 जून पासून सुरुवात व्हायला हवी होती. असे वाटत होते की या सत्रात कदाचित उशिरा शाळा सुरु होतील. पण कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे ऑगस्ट महिन्यापर्यंत शाळा सुरु होवू शकल्या नाही. तेव्हा असे वाटू लागले की, दरवर्षी आपण तालुकास्तरावर इयत्ता 5 वी व 8 वी साठी विद्यार्थी व शिक्षक यांचेसाठी मार्गदर्शन सत्र राबवितो, ते या वर्षी कोरोनामुळे शक्य होणार नाही. work from home सुरु होते, त्यातच शासन स्तरावर शाळा बंद पण शिक्षण सुरु ही संकल्पना रूढ होऊ लागली. याच विचाराने प्रेरित होऊन मी शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव online पद्धतीने कसा घेतं येईल? यादृष्टीने विचार करू लागले. मला तंत्रज्ञानाचे थोडे ज्ञान असल्यामुळे इ. 5 वी व 8 वीतील गणित विषयातील घटकांवर आधारित व्हिडिओ निर्मितीचे काम सुरु केले. पण व्हिडिओ तयार करण्यात बराच वेळ लागतो, हे जाणून मी आणखी दुसरा मार्ग शोधू लागले.

2) **उपक्रमाचे वेगळेपण** –

शालेय जीवनातली स्पर्धा परीक्षा म्हटले की, नाव येते शिष्यवृत्ती परीक्षेचे. स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने शिष्यवृत्ती परीक्षा सुरु केलेली आहे.

शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यामध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आत्मविश्वास निर्माण होऊन यातूनच पुढे काही जण मोठे अधिकारी झालेले आपण बघतो. त्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी म्हणून महत्त्वाची आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत वर्गातील निवडकच मुले सहभागी होतात. ती मुले मुळातच हुशार असतात. त्यांच्या विषयाच्या मुलभूत संकल्पना स्पष्ट असतात. त्यामुळे या मुलांना सरावासाठी मदत केल्यास सोयीचे होईल, असे वाटले. सोबतच प्रश्नसंच पुरवून सराव करण्याच्या दृष्टीने मी प्रयत्न करू लागले. मुले सध्या घरीच सुरक्षित आहेत, तर घरबसल्या मुलांना चाचणी मिळाली आणि ती त्यांनी नियमितपणे सोडवली तर शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी होण्यास मदत होईल, असे वाटले. यातूनच मी google form च्या मदतीने गणित विषयातील प्रत्येक घटकनिहाय 10 प्रश्न अशी एकूण 20 गुणांची चाचणी दर आठवड्याला पाठवण्याचे ठरले. यासाठी मी शुक्रवार दिवस निवडला. म्हणून या उपक्रमाला नाव दिले 'शिष्यवृत्ती शुक्रवार'.

3) **उपक्रमाची उपयुक्तता** –

आजपर्यंत शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शाळेत, वर्गात शिक्षकांमार्फातच केला होता. पण covid 19 मुळे शिष्यवृत्ती परीक्षेतील सरावात खंड पडू नये या उद्देशाने प्रथमच online test series द्वारे तसेच video द्वारे घरबसल्या android mobile च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सराव सुरु ठेवण्याचे ठरले, हेच या नवोपक्रमाचे वेगळेपण आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाची तसेच तंत्रज्ञानाची आवड असल्यामुळे त्यांनी व सोबतच शिक्षकांनीही सदर नवोपक्रमाला भरपूर प्रतिसाद दिला. दर शुक्रवारला गणित विषयाचे घटकनिहाय 10 प्रश्न इयत्ता 5 वी व 8 वी च्या विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षकांच्या माध्यमातून पोहोचू लागले. मुले आठवडाभरात त्यांचा सराव करू लागले व online test सोडवू लागले. मिळालेल्या गुणांचा screen shot विद्यार्थी शिक्षकांना mobile वर पाठवू लागले आणि शिक्षक तालुक्याच्या whatsapp group वर पाठवू लागले. ज्या मुलांना प्रश्नात अडचण वाटू लागली, ती मुले मला किंवा शिक्षकांना फोन वर संपर्क साधू लागली, यातूनच माझे विद्यार्थी व शिक्षकांशी चर्चेचे नाते निर्माण झाले. अशाप्रकारे विद्यार्थ्यांना या नवोपक्रमाचा उपयोग होत असल्याचे आढळले.

**नवोपक्रमाची नवीनता –**

1. Google form द्वारे test – दर शुक्रवारला गणित विषयाचे घटकनिहाय 10 प्रश्न इयत्ता 5 वी व 8 वी च्या विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षकांच्या माध्यमातून पाठविले.
2. व्हिडिओ निर्मिती – विद्यार्थ्यांना घरीच सुरक्षित ठिकाणी अभ्यास पोहोचविण्यासाठी अनेक शैक्षणिक स्व निर्मित व्हिडिओ वापरण्यात आले आहे. Google form मधील प्रश्नांची उकल करणारे व्हिडिओ मी स्वत: तयार केल्याने विद्यार्थ्यांची मानसिकता, पालकांची परिस्थिती, वेळ, सराव अशा अनेक गोष्टींचा विचार करण्यात आला आहे.
3. वैयक्तिक मार्गदर्शन – online test मधील एखादा प्रश्न जर मुलांना समजला नाही तर ते मला whatsapp वर message पाठवून विचारतात आणि मी त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करते.
4. सहकार्य – हा नवोपक्रम विद्यार्थी, शिक्षक, पालक, तंत्रज्ञान या सर्वांच्या सहकार्यावर अवलंबून आहे.
5. Helpfull to all – हा नवोपक्रम फक्त माझ्या तालुक्यातील विद्यार्थ्यांपुर्तच मर्यादित नसून आमच्या जिल्ह्यातील तसेच इतर जिल्ह्यातील विद्यार्थी व शिक्षकांना लाभदायक आहे.

   अशाप्रकारे या तत्त्वांवर हा नवोपक्रम आधारलेला आहे.

**नवोपक्रमाची उद्दिष्टे –**

1. स्पर्धेच्या युगातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये सामर्थ्य निर्माण करणे.
2. विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी होण्यासाठी गणित विषयाच्या क्षमता विकसित करणे.
3. विद्यार्थ्यांमध्ये स्वयं अध्ययनाची सवय दृढ करणे.
4. विद्यार्थ्यांना सहज आकलन होईल अशा साहित्याची निर्मिती तंत्रज्ञानाच्या आधारे करणे.
5. शाळा बंद असतांनाही विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात गुंतवून ठेवणे.

**व्याप्ती व मर्यादा -**

सदर नवोपक्रमाकरिता चंद्रपूर तालुक्यातील मराठी माध्यमांच्या शाळांतील इयत्ता 5 वी व 8 वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. सदर नवोपक्रम हा या तालुक्यापुरताच मर्यादित आहे.

**नवोपक्रमाचे नियोजन –**

1) **उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण** –

चंद्रपूर जिल्ह्यांतर्गत चंद्रपूर तालुक्यातील इयत्ता 5 वी व 8 वी च्या मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा सराव घेतल्या जातो. यासाठी तालुकास्तरावर/बीटस्तरावर/केंद्रस्तरावर शिक्षकांच्या कार्यशाळात तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन केले जाते. त्यानंतर शिक्षक वर्गात प्रत्यक्ष विद्यार्थ्यांचा सराव घेतात. कधी कधी केंद्रस्तरावर विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तथा चाचणीचेही आयोजन करण्यात येते. पण सन 2020 – 21मध्ये कोरोना महापर्वात शाळा बंद झाल्या होत्या. शिक्षणप्रवाह खंडित झाला होता. शिक्षकांच्या कार्यशाळाही घेता येणे शक्य नव्हते. मुले शाळेत येत नसल्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव कसा घेणार? असा प्रश्न समोर येत होता.

2) **संबंधित व्यक्तींशी व तज्ज्ञांशी चर्चा –**

तेव्हा या अडचणीवर मात करण्यासाठी मा. श्री. समाधान भसारकर, चंद्रपूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांचेशी चर्चा केली. साप्ताहिक सभेत केंद्रप्रमुख व इतर सहकारी यांचेशी चर्चा केली. तेव्हा शासनातर्फे 'शाळा बंद पण शिक्षण सुरु' याअंतर्गत विविध उपक्रम सुरु झाले होते. याच धर्तीवर online शिक्षणाचा पर्याय अवलंबावा, असे ठरविले.

**3) आवश्यक साधनांचा विचार –**

पालकांकडे Android mobile आहेत, त्या द्वारे शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव करता येईल, असा विचार पुढे आला आणि त्यादृष्टीने तालुक्याचे शिष्यवृत्ती सरावाचे नियोजन सुरु झाले.

**4) करावयाच्या कृतींचा क्रम -**

सदर नवोपक्रमाचे खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आले.

1. सुरुवातीला मा. गटशिक्षणाधिकारी यांचेशी चर्चा करुन तालुक्यातील मराठी माध्यमांच्या शाळांतील इयत्ता 5 वी व 8 वी च्या शाळातील मुख्याध्यापक यांना पत्र पाठवून खालील सूचना देणे .
    - शिष्यवृत्ती परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांची निवड करून त्यांच्या पालकांशी चर्चा करणे.
    - शाळेतील शिक्षकांवर विद्यार्थ्यांचा नियमित सराव घेण्याची जबाबदारी सोपवून सरावाचे वेळापत्रक तयार करणे.
    - शक्य झाल्यास पालकांना शिष्यवृत्ती सरावाकरिता गाईड्स, पुस्तके, सरावसंच खरेदी करण्यास प्रवृत्त करणे.
    - विद्यार्थ्यांचा whatsapp group तयार करून दर शुक्रवारला त्यावर सरावसंच पाठवून विद्यार्थ्यांनी सोडवल्याचा आढावा घेणे.
    - विद्यार्थ्यांना अध्ययनातील येणा-या अडचणी सोडवून मदत करणे. यासाठी Google form मधील प्रश्नांची उकल करणारे विविध व्हिडिओ पाठविणे.
    - इतर पूरक साहित्याचाही वापर करता येईल. शिक्षकांनी स्व निर्मित प्रश्नसंच, व्हिडिओ इतर शाळेतील शिक्षकांकरिता उपलब्ध करून देणे.
2. मुख्याध्यापक यांना लिंक पाठवून शिष्यवृत्ती परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांची संख्या तसेच मार्गदर्शक शिक्षकांची यादी मिळवणे.
3. इयत्ता 5 वी व 8 वी तील गणित विषयाच्या घटकनिहाय 10 प्रश्नांच्या चाचण्या google form द्वारे तयार करणे.
4. चाचणीचा प्रतिसाद Excel Sheet मध्ये संकलित करणे.

5. whatsapp group वर शिक्षकांशी चर्चा करून संवाद साधून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेणे.
6. विद्यार्थी व शिक्षक यांना येणा-या अडचणीबाबत चर्चा करून त्या अडचणी सोडविण्यासाठी घटकनिहाय व्हिडिओ निर्मिती करून youtube लिंक पाठवणे.
7. संपूर्ण घटक झाल्यावर परीक्षेच्या एक महिना आधी भारांशनिहाय सरावसंच google form द्वारे तसेच pdf स्वरुपात omr sheet सह पाठवणे.
8. शाळानिहाय विद्यार्थ्यांचे responses तपासणे.
9. पर्यवेक्षीय यंत्रणेच्या मासिक सभेत याविषयावर चर्चा करून सध्यस्थिती मांडणे. तसेच शाळाभेटीत विशेषकरून शिष्यवृत्ती परीक्षेचा आढावा घेण्यास प्रवृत्त करणे.

**5) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण –**

सदर उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता मुख्याध्यापक यांना पाठविलेल्या पत्राचा आढावा घेण्याकरिता केंद्रप्रमुख यांचेशी नियमित संपर्क साधणे. 100% शाळेनी लिंकमध्ये माहिती भरण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे.


**6) कार्यवाहीचे टप्पे ( वेळापत्रक ) –**


सदर उपक्रमासाठी प्रत्येक आठवड्यातील शुक्रवार हा दिवस ठरविण्यात आला. प्रथम दोन महिने गणित विषयाचा सराव, त्यानंतर बुद्धीमत्ता चाचणी व भाषा विषयाचा सराव करण्यासाठी नियोजन करून सराव संच निर्मितीचे काम सुरु केले.

**7) उपक्रमासाठी इतरांची मदत –**

या नवोपक्रमात तयार करण्यात येणा-या चाचणीच्या प्रभावी लिंक तयार करण्यासाठीची माहिती घेण्याकरिता तालुक्याच्या MIS Coordinator ची मदत घेणे. तसेच सदर उपक्रमाचा नियमित आढावा घेण्याकरिता तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, विषय साधनव्यक्ती, विशेष शिक्षक इ. ना साप्ताहिक आढावा सभेत शाळाभेटीत शिष्यवृत्ती सराव सुरु आहे की नाही हे बघण्यासाठी मा. गटशिक्षणाधिकारी यांचेमार्फत सूचित करण्याचे ठरविले.

**8) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे –**




**नवोपक्रमाची कार्यपद्धती –**

सदर नवोपक्रमाकरिता प्रायोगिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला. या नवोपक्रमासाठी निश्चित कालावधी ठेवला नाही.

**1) पूर्व स्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी –**

चंद्रपूर तालुक्यातील इयत्ता 5 वी व 8 वी च्या मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा सराव घेतल्या जात होता. यासाठी तालुकास्तरावर/बीटस्तरावर/केंद्रस्तरावर शिक्षकांच्या कार्यशाळात तज्ज्ञांद्वारे मार्गदर्शन होत होते. त्यानंतर शिक्षक वर्गात प्रत्यक्ष

विद्यार्थ्यांचा सराव घ्यायचे. कधी कधी केंद्रस्तरावर विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन तथा चाचणीचेही आयोजन केले जायचे. उन्हाळ्यात मी या सत्रात शिष्यवृत्ती परीक्षेबाबत काम करण्यासाठीचे नियोजन केले होते. त्यासाठी निवडक 10 शाळाही निवडल्या होत्या. पण lockdown मुळे माझे नियोजन ठप्प पडले. कारण सन 2020 – 21मध्ये कोरोना महापर्वात शाळा बंद झाल्या होत्या. शिक्षणप्रवाह खंडित झाला होता. शिक्षकांच्या कार्यशाळाही घेता येणे शक्य नव्हते. मुले शाळेत येत नसल्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव कसा घेणार? असा प्रश्न समोर येत होता. तेव्हा या अडचणीवर मात करण्यासाठी मा. श्री. समाधान भसारकर, चंद्रपूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांचेशी चर्चा केली. साप्ताहिक सभेत केंद्रप्रमुख व इतर सहकारी यांचेशी चर्चा केली. तेव्हा शासनातर्फे 'शाळा बंद पण शिक्षण सुरु' याअंतर्गत विविध उपक्रम सुरु झाले होते. याच धर्तीवर online शिक्षणाचा पर्याय अवलंबावा, असे ठरविले. पालकांकडे Android आहेत, त्या द्वारे शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव करता येईल, असा विचार पुढे आला आणि त्यादृष्टीने तालुक्याचे शिष्यवृत्ती सरावाचे नियोजन सुरु झाले.

**2) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी –**

सुरुवातीला मा. गटशिक्षणाधिकारी यांचेशी चर्चा करुन तालुक्यातील मराठी माध्यमांच्या शाळांतील इयत्ता 5 वी व 8 वी च्या शाळातील मुख्याध्यापक यांना पत्र पाठवून खालील सूचना देण्यात आल्या.

- शिष्यवृत्ती परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांची निवड करून त्यांच्या पालकांशी चर्चा करणे.
- शाळेतील शिक्षकांवर विद्यार्थ्यांचा नियमित सराव घेण्याची जबाबदारी सोपवून सरावाचे वेळापत्रक तयार करणे.
- शक्य झाल्यास पालकांना शिष्यवृत्ती सरावाकरिता गाईड्स, पुस्तके, सरावसंच खरेदी करण्यास प्रवृत्त करणे.
- विद्यार्थ्यांचा whatsapp group तयार करून दर शुक्रवारला त्यावर सरावसंच पाठवून विद्यार्थ्यांनी सोडवल्याचा आढावा घेणे.
- विद्यार्थ्यांना अध्ययनातील येणा-या अडचणी सोडवून मदत करणे. यासाठी Google form मधील प्रश्नांची उकल करणारे विविध व्हिडिओ पाठविणे.

- इतर पूरक साहित्याचाही वापर करता येईल. शिक्षकांनी स्व निर्मित प्रश्नसंच, व्हिडिओ इतर शाळेतील शिक्षकांकरिता उपलब्ध करून देणे.

असे पत्र मुख्याध्यापकांना प्राप्त होताच त्यांनी शाळास्तरावर लगेच कार्यवाही सुरु केली. त्यानंतर मुख्याध्यापक यांना लिंक पाठवून शिष्यवृत्ती परीक्षेस बसणा-या विद्यार्थ्यांची संख्या तसेच मार्गदर्शक शिक्षकांची यादी मिळवली. यादीतील शिक्षकांचा तालुकास्तरावर एक whatsapp group तयार करण्यात आला. या कालावधीतच मी प्रश्नसंच तयार केले. तसेच केंद्रस्तर/शाळास्तर सर्व व्यवस्थापनाच्या शिक्षकांच्या online सभा घेवून या उपक्रमाबाबत अधिकची माहिती देऊन मुलांचा सराव घेण्यास तयार केले.

माहे सप्टेंबर 2020 पासून या उपक्रमास सुरुवात केली. सुरुवातीला फक्त गणित विषय मी निवडला. कारण या विषयात भरपूर अडचणी असल्याचे जाणवले. शिष्यवृत्ती परीक्षेत गणित विषयातील अडचणींमुळे गुण कमी मिळत असल्याचा माझा अनुभव होता. यावर मात करण्यासाठी आपण गणिताच्या सरावापासूनच सुरुवात करावी असे ठरवले. यासाठी दर शुक्रवारला सकाळी इ. 5 वी व 8 वी चे गणित विषयाचे 10 प्रश्न मुलांना सराव करण्यासाठी google link शिक्षकांच्या whatsapp group वर पाठविण्यात आली. त्यानंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या whatsapp group वर लिंक पाठवली. त्यानंतर ज्या मुलांनी ती test सोडवली, त्यांचे responses माझ्या ई-मेलला submit होत होते. त्यामुळे मला किती मुलांनी test सोडवली, हे कळत होते. पण शिक्षकांना कळत नव्हते. मग काही शिक्षकांनी हा प्रश्न माझ्यापुढे मांडला. मग यावर असा उपाय शोधला की मुलांनी test सोडवल्यावर मिळालेल्या गुणाचा screen shot काढून शिक्षकांना पाठवावे. अशाप्रकारे शिक्षक व मला आढावा घेणे सोयीचे झाले. मुलांना test सोडवण्यासाठी एक आठवड्याचा अवधी मिळायचा. ज्या प्रश्नाबाबत मुलांना अडचण जाणवायची ते प्रश्न मुले whatsapp द्वारे शिक्षक व मला पाठवायची. मग आम्ही त्याचे उत्तर कागदावर सोडवून मुलांना पाठवायचो. असे नियमित सुरु झाले. सुरुवातीला android mobile च्या कमतरतेमुळे प्रतिसाद कमी होता. पण शिक्षकांच्या माध्यमातून पालकांशी चर्चा करून त्यांचे सहकार्य मिळवले. एखाद्या पालकाकडे android mobile नसल्यास ते आपल्या शेजारच्यांची मदत तसेच शाळेतील शिक्षक यांचे mobile घेवून विद्यार्थी सराव करू लागले.

शिष्यवृत्ती परीक्षा ही एक स्पर्धा परीक्षा आहे. त्याचे स्वरूप कसे असते? पेपर्सची रचना कशी असते? किती गुण व वेळ असतो? प्रश्न कशाप्रकारचे असते? इ. बाबींवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे म्हणून एक व्हिडीओ तयार करून त्याची youtube लिंक शिक्षकांच्या

माध्यमातून विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोहचविण्यात आली. तसेच प्रश्नांची उकल करणारे व्हिडीओ देखील निर्मितीचे काम सुरु करून youtube लिंक पाठविण्यात येत होती. सोबतच दिवाळी नंतर सर्व प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका व OMR Sheet ही pdf स्वरुपात पाठविण्यात आल्या. नियमित आढावा घेतला गेला.

नवोपक्रमाच्या सुरुवातीला गणित विषयाच्या चाचण्यांची लिंक देण्यात आली होती. नंतर बुद्धीमत्ता चाचणी व मराठी विषयाचेही सरावसंच लिंक द्वारे पाठविण्यात आले. मी परीक्षेच्या वेळेपर्यंत लिंक सुरु ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांनी वारंवार सराव केला. तसेच एका mobile वरून कितीही वेळा test सोडवता येत होती. त्यामुळे विद्यार्थी सामुहिकपणे सराव करीत होती. तसेच आमच्या तालुक्यातील श्रीमती रजनी आघात, विषय साधनव्यक्ती यांनी इंग्रजी विषयाच्या चाचणीच्या लिंक पाठविल्यात. सदर नवोपक्रमाच्या लिंक आमच्या तालुक्यातील BRC group , सर्व व्यवस्थापन H M group तसेच शाळास्तरावर जबाबदारी सांभाळणा-या शिक्षकांचाही ग्रुप यांच्या माध्यमातून मुलांपर्यंत लिंक पोहचत होत्या. मी यात मराठी माध्यमांच्या शाळांना सहभागी करून घेतले होते. पण काही इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील शिक्षक तसेच इतर तालुक्यातील व जिल्ह्यातील शिक्षकांनीही या उपक्रमाविषयी कौतुक केले आणि त्यांनीही यात स्वत:हून भाग घेतला. मग त्यांचाही एक broadcast group तयार करून सर्व चाचणी व व्हिडिओ यांची लिंक त्यांनाही पाठविण्यास सुरु केले. परीक्षेच्या एक महिना आधी संपूर्ण घटकावर आधारित भारांश्निहाय प्रश्नसंच मराठी माध्यम तसेच इंग्रजी माध्यमाकरिता तयार करून पाठविले. अशाप्रकारे मुलांनी घटकनिहाय 28 test आणि भारांश्निहाय 4 test सोडविल्या. त्यानंतर परीक्षेच्या एक महिनापुर्वी मुलांनी तयारी कशी करावी? याबाबतचा जिल्हास्तरावरून आलेला व्हिडिओ मुलांना बघण्यास सांगितले. ज्यात मी गणित विषयाच्या पूर्वतयारीबाबत मार्गदर्शन केले होते. त्याचाही मुलांना फायदा झाला.

### 3) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी -

शाळाभेटीत मा. गटशिक्षणाधिकारी यांच्या माध्यमातून केंद्रप्रमुख, साधनव्यक्ती यांना या उपक्रमाबाबत आढावा घेण्यासाठी सूचित केले. त्यांचाही प्रतिसाद उत्तम मिळाला. तसेच यात आमच्या जिल्ह्यातील इतर तालुक्यातील तसेच इतर जिल्ह्यातील विद्यार्थीही सहभागी होऊ लागले. त्यामुळे हा नवोपक्रम राज्यातील सर्व विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी उपयुक्त ठरला. जानेवारी 2021 मध्ये इयत्ता 5 वी पासूनच्या शाळा सुरु झाल्यावर हा उपक्रम अधिक बळकट

झाला. काही शाळेत मुलांना बोलावून स्मार्ट टी.व्ही. वर प्रश्न दाखवून वहीत सराव करून घेतला. तसेच काही शाळेनी मला घटक निहाय सराव संचाच्या pdf मागितल्या. मी त्यांना pdf पाठवल्यावर त्यांनी प्रिंट करून झेरॉक्स काढून omr sheet सोबत विद्यार्थ्यांना सराव करण्याची संधी दिली. त्यामुळे मुलांना online सोबतच offline सरावही करता आला. तसेच दर आठवड्यात प्रत्येक केंद्रातील दोन शाळांना मी इ. 5 वी व 8 वी च्या वर्गाना भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत होते. तसेच काही पालकांनी मुलांना गाईड्स खरेदी करून दिल्या, तर काही शाळेनी शाळेतील उपलब्ध संच मुलांना सरावाकरिता दिले. आणि तेही कमी पडल्यास शिक्षकांनी स्वत: सरावसंच खरेदी करून विद्यार्थ्यांना पुरवले.

**4) कार्यवाही करताना आलेल्या अडचणी –**

या कोरोनाच्या आपदग्रस्त परिस्थितीतही शिक्षण सुरु ठेवण्यास ही online test सराव पद्धती अतिशय फायदेशीर ठरली आहे. परंतु अशा शिक्षणात काही अडचणीही आहेत. ही पद्धत थोडी खर्चिक आहे. पालकांना विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष द्यावे लागते. काही वेळा असे आढळून आले की, मुले चाचणीव्यतिरिक्त अभ्यासाच्या निमित्ताने mobile चा गैरवापर करतात आणि गेमकडे वळताना दिसतात. असे मुळीच व्हायला नको, यासाठी सर्व पालक व विद्यार्थी यांना शिक्षकांमार्फत मार्गदर्शन करण्यात आले.

**5) माहितीचे विश्लेषण -**

सोबतच आमच्या चंद्रपूर जिल्ह्यात सुरु झालेल्या District Live Scholarship Classes उपक्रमातही या मुलांना सहभागी करून घेतले. आणि यात मी इयत्ता 8 वी तील गणित विषयाचे मार्गदर्शन करीत असल्यामुळे मुलांना मी अधिक परिचित झाले. यात शासकीय शाळांसोबत खाजगी शाळाही उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आहे. सुरुवातीला 150 ते 200 विद्यार्थी यात सहभागी होत होते. पण नंतर सरासरी 350 ते 400 विद्यार्थी यात सहभागी होत आहे. चंद्रपूर तालुक्यातील 200 ते 250 विद्यार्थी यात सहभागी होत होते.


विद्यार्थी प्रतिसाद तक्ता –

| इयत्ता | विषय – गणित | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संच 1 | संच 2 | संच 3 | संच 4 | संच 5 | संच 6 | संच 7 | संच 8 | संच 9 |
| 5 वी | 75 | 115 | 152 | 176 | 189 | 208 | 177 | 278 | 315 |
| 8 वी | 78 | 89 | 91 | 98 | 102 | 104 | 120 | 188 | 201 |


अशा प्रकारे हळूहळू विद्यार्थी सहभाग वाढत गेला.

**तुलनात्मक तक्ता (आलेखासह) -**

इयत्ता 5 वी – शिष्यवृत्ती परीक्षा निकाल




**सन 2020 चा आलेख**






**सन 2021 चा आलेख**

सन 2020 मध्ये इयत्ता 5 वीतील पात्र विद्यार्थी टक्केवारी 3.2 % एवढी होती आणि सन 2021 मध्ये इयत्ता 5 वीतील पात्र विद्यार्थी टक्केवारी 7.5 % एवढी आली. यावरून या नवोपक्रमाची उपयोगिता पडताळण्यास मदत झाली.

इयत्ता 8 वी – शिष्यवृत्ती परीक्षा निकाल

सन 2020 -                                                    सन 2021 -




सन 2020 मध्ये इयत्ता 8 वीतील पात्र विद्यार्थी टक्केवारी 2.8 % एवढी होती आणि सन 2021 मध्ये इयत्ता 5 वीतील पात्र विद्यार्थी टक्केवारी 5.2 % एवढी आली. यावरून या नवोपक्रमाची उपयोगिता पडताळण्यास मदत झाली.

**नवोपक्रमाची फलनिष्पत्ती ( उद्दिष्टानुसार ) –**

या नवोपक्रमाचे लेखन करीत असतानाच शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यात तालुक्यातील पात्र विद्यार्थी संख्येत वाढ झाल्याचे दिसले. प्रस्तुत नवोपक्रमात विविध टप्प्यावरील निरीक्षण व नोंदी आणि त्यावरील विश्लेषणावरून सदर नवोपक्रमाची यशस्विता पुढीलप्रमाणे दिसून आली.

**उद्दिष्ट 1 नुसार –**

1. शिष्यवृत्ती परीक्षेचे स्वरूप व महत्त्व विद्यार्थ्यांना व्हिडिओ च्या माध्यमातून समजावून दिल्यामुळे जास्तीत जास्त मुले यात सहभागी झालीत.
2. शाळा बंद असतानाही शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव mobile च्या माध्यमातून करता येऊ शकतो, असा आत्मविश्वास विद्यार्थ्यांत आल्यामुळे मुलांचा सराव झाला.

**उद्दिष्ट 2 नुसार –**

1. सुरुवातीला गणित विषयाचा सराव झाल्यामुळे गणिताची भीती दूर झाली.
2. गणित विषयाचा अधिक सराव test व व्हिडिओ द्वारे झाल्यामुळे मुलांच्या गणित विषयाच्या क्षमता विकसित झाल्यात.

**उद्दिष्ट 3 नुसार –**

1. मुले स्वत: test सोडवू लागली आणि अडचण असल्यास पुस्तकांचा आधार, शिक्षकांची मदत घेऊन सराव करू लागली.
2. आपले सहकारी मित्र व पालक यांचीही मदत घेऊन स्वत: सराव करू लागली.

**उद्दिष्ट 4 नुसार –**

1. whatsapp group हाताळणे, google form वर test सोडविणे तसेच youtube वर व्हिडिओ बघणे, इ.च्या माध्यमातून मुलांमध्ये तंत्रज्ञानाची आवड निर्माण होऊन त्याची उपयोगिता कळली .
2. google form वर test सोडवून त्याची लिंक शिक्षकांना कशी पाठवावी, हेही मुलांनी अवगत केले.

**उद्दिष्ट 5 नुसार –**

1. शाळा बंद असतानाही या नवोपक्रमाच्या माध्यमातून मुलांचा शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव सुरु राहिला.
2. गणितात दिलेली माहिती काळजीपूर्वक ऐकून/वाचून/निरीक्षण करुन सोडवू लागली.
3. मुले स्वत: गणिते तयार करु लागली.

**समारोप –**

शालेय जीवनातली स्पर्धा परीक्षा म्हटले की, नाव येते शिष्यवृत्ती परीक्षेचे. स्पर्धा परीक्षांच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने शिष्यवृत्ती परीक्षा सुरु केलेली आहे. शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यामध्ये स्पर्धा परीक्षांविषयी आत्मविश्वास निर्माण होऊन यातूनच पुढे काही जण मोठे अधिकारी झालेले आपण बघतो. त्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी म्हणून महत्त्वाची आहे. यासाठी प्रयत्न करण्याचे मी ठरविले. पण कोरोना महापर्वात शाळा बंद झाल्या होत्या. शिक्षण प्रवाह खंडित झाला होता. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान बघून मन अस्वस्थ झाले होते. तेव्हा शासनातर्फे 'शाळा बंद पण शिक्षण सुरु' याअंतर्गत विविध उपक्रम सुरु झाले होते. याच धर्तीवर online शिक्षणाचा पर्याय अवलंबावा, असे ठरविले. पालकांकडे Android आहेत, त्या द्वारे शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव करता येईल, असा विचार पुढे आला आणि त्यादृष्टीने तालुक्याचे शिष्यवृत्ती सरावाचे नियोजन सुरु झाले.

पण 'शिष्यवृत्ती शुक्रवार' हा नवोपक्रम राबविताना अनेक अडचणी आल्या. विद्यार्थ्यांकडील android mobile ची कमतरता, गावातील range problem, तंत्रज्ञानाचा अभाव, पालकांचे अज्ञान इ. वर मात करीत 'शिष्यवृत्ती शुक्रवार' हा नवोपक्रम माझ्या चंद्रपूर तालुक्यातील इयत्ता 5 वी व 8 वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी तर उपयुक्त आहेच पण जिल्ह्यातील तसेच राज्यातील सर्वच विद्यार्थी व शिक्षकांनाही 100% उपयुक्त ठरणार आहे. शाळा बंद असतानाही या नवोपक्रमाच्या माध्यमातून मुलांचा शिष्यवृत्ती परीक्षेचा सराव सुरु राहिला. शिष्यवृत्ती परीक्षेचे स्वरूप व महत्त्व विद्यार्थ्यांना व्हिडिओ च्या माध्यमातून समजावून दिल्यामुळे जास्तीत जास्त मुले यात सहभागी झालीत.

अशा पद्धतीने या कोरोनाच्या आपदग्रस्त परिस्थितीतही शिक्षण सुरु ठेवण्यास ही online test सराव पद्धती अतिशय फायदेशीर ठरली आहे. परंतु अशा शिक्षणात काही अडचणीही आहेत. ही पद्धत थोडी खर्चिक आहे. पालकांना विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष द्यावे लागते. काही वेळा असे आढळून आले की, मुले चाचणीव्यतिरिक्त अभ्यासाच्या निमित्ताने mobile चा गैरवापर करतात आणि गेमकडे वळताना दिसतात. असे मुळीच व्हायला नको, यासाठी सर्व पालक व विद्यार्थी यांना शिक्षकांमार्फत मार्गदर्शन करण्यात आले. या नवोपक्रमाचे लेखन करीत असतानाच शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यात तालुक्यातील पात्र विद्यार्थी संख्येत वाढ झाल्याचे दिसले. इयत्ता 5 वीत 76 मुले व इयत्ता 8 वीत 55 मुले पात्र

झालीत. आतापर्यंत ही संख्या 50 च्या पुढे नव्हती. ज्या मुलांनी नियमित सराव केला होता, मेहनत घेतली होती, ती मुले पात्र झालीत. आणि बरीच मुले चांगल्या गुणांनी पास झाली. या नवोपक्रमासाठी मार्गदर्शन करणारे आमचे DIET चे प्राचार्य, अधिव्याख्याता, आमच्या तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख व माझे सहकारी विषय साधनव्यक्ती आणि याचबरोबर सदैव प्रेरणा देणारे आमचे शिक्षक आणि विद्यार्थी या सर्वांचे मन:पूर्वक धन्यवाद.

**संदर्भग्रंथसूची –**



| अ. क्र. | ले खक | पुस्तकाचे नाव | प्रकाशन संस्था | वर्ष |
|---|---|---|---|---|
| 1 | | पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. 5 वी | नवनीत प्रकाशन | |
| 2 | | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. 8 वी | नवनीत प्रकाशन | |
| 3 | सुप्रिया सप्रे | नवोपक्रम पुस्तिका | विद्या प्रकाशन | 2008 |
| 4 | | पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. 5 वी | अक्षरगंगा प्रकाशन | |
| 5 | | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. 8 वी | अक्षरगंगा प्रकाशन | |
| 6 | प्रवीण बनकर | Genius Maths and Tricks | Genius Maths Publication | |
| 7 | प्रवीण बनकर | पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. 5 वी | Genius Maths Publication | |
| 8 | प्रवीण बनकर | पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. 8 वी | Genius Maths Publication | |
| 9 | अच्युत गोडबोले | गणिती | मनोविकास प्रकाशन | 2017 |

# परिशिष्टे –

## परिशिष्ट 1 –

शिष्यवृत्ती शुक्रवार या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेल्या गणित विषयाच्या google लिंक ( इयत्ता 5 वी )

1) https://forms.gle/heqRpgBwPT9iSKVt5
2) https://forms.gle/7YqRTcUgFh6au3h19
3) https://forms.gle/hpkDZBxfrHzzNzhu9
4) https://forms.gle/2z7aJq53bRhxPsMt7
5) https://forms.gle/Gbd9t82gznRrGM1R9
6) https://forms.gle/kBU4vr9LDebdsAKX7
7) https://forms.gle/igZctunTUtGg82bG7
8) https://forms.gle/AEHHe8RD7X3qoDSL9
9) https://forms.gle/PguLNv6pwtKwJ1dr5
10) https://forms.gle/ZnJUrak8cYKSG98Z8
11) https://forms.gle/Txyj8YG78Uwsm71t9
12) https://forms.gle/BVir9JhmkkerPxzV9
13) https://forms.gle/7PonbXPMQ6xC2nHq6
14) https://forms.gle/pUvQYW38HscdgyMi8
15) https://forms.gle/bNdPQDywMy1Vf2fp9
16) https://forms.gle/xwxHvUKrG45LMwoD7
17) https://forms.gle/7bPcZpXBCZhvj122A
18) https://forms.gle/GRbxqRmgyVJUGXd67
19) https://forms.gle/MkbRHjhJLoZG5ymk9
20) https://forms.gle/D47Ba6p9V6Pp4Zs96
21) https://forms.gle/ebTkFrE4LEra9BGS6
22) https://forms.gle/baj6uCzLai3r1Egq9
23) https://forms.gle/dTHrFu23aBuFkepYA
24) https://forms.gle/ZDAgG1WxRjVDns1k7

**25)** [https://forms.gle/Lidyox7gL4bc5WGs5](https://forms.gle/Lidyox7gL4bc5WGs5)

**26)** [https://forms.gle/dCHZ63QkJFw9C4iv9](https://forms.gle/dCHZ63QkJFw9C4iv9)

**27)** [https://forms.gle/WqHg5iaDE87ioh84A](https://forms.gle/WqHg5iaDE87ioh84A)

**28)** [https://forms.gle/cMHrDyrK1SP3zFJQ9](https://forms.gle/cMHrDyrK1SP3zFJQ9)

**परिशिष्ट 2 –**

शिष्यवृत्ती शुक्रवार या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेल्या गणित विषयाच्या google लिंक ( इयत्ता 8 वी )

1) https://forms.gle/xH2Pm2oareibEHTcA
2) https://forms.gle/QfH2wnXhxPv9tbtL9
3) https://forms.gle/1dvQwjwhekJ1M6q19
4) https://forms.gle/qPFJ7JamecmxgLBb8
5) https://forms.gle/FoPjmbVfFzD49aYL8
6) https://forms.gle/nqG69hmcxgDGY74e9
7) https://forms.gle/YYYQWqfQugThk5Bt5
8) https://forms.gle/cCre1aiHmi6iVBt17
9) https://forms.gle/P7G4csRkizTmeBXW6
10) https://forms.gle/jSW5Kowiq6kaGsqPA
11) https://forms.gle/J8BpjgH7qdnJcK4m7
12) https://forms.gle/3iAzTbJeW773dKuW9
13) https://forms.gle/SAk2toPMKov3aBAq6
14) https://forms.gle/cebz6HZw4u1vu2C97
15) https://forms.gle/PFHG3Eo9ze1yiLvH6
16) https://forms.gle/Va7MwTDJjfUJzY2j7
17) https://forms.gle/exjCTXZAWmMzcUoa6
18) https://forms.gle/QaPbSCKMJB4biaEc8
19) https://forms.gle/Pwfw9N9aazL6dd7A8
20) https://forms.gle/JfAWYChoXXxS4uen8
21) https://forms.gle/eUcv8UUSPvKM9vEY6
22) https://forms.gle/m9xytAb4vhHKSbeT7
23) https://forms.gle/2b5ZvENW2aDvDSG77
24) https://forms.gle/SxyXNQT3on2sP6899
25) https://forms.gle/ZxL6gJe6QdwEtQ5Q9

**26)** https://forms.gle/K7AAgWHjid2NFmaB6

**27)** https://forms.gle/pbhgdv2JjvoSqFy5A

**28)** https://forms.gle/DtdL2akVdBW5jpZt8

## परिशिष्ट 3 –

शिष्यवृत्ती शुक्रवार या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेल्या गणित विषयाच्या **youtube** लिंक ( इयत्ता 5 वी व 8 वी )

1) **https://youtu.be/EmQqqbXDZK8**
2) **https://youtu.be/75k9s7niyOI**
3) **https://youtu.be/75XCumAry3E**
4) **https://youtu.be/YjShuKL_6lY**
5) **https://youtu.be/UbCW4gVoHAI**
6) **https://youtu.be/yKOEJPLLLds**
7) **https://youtu.be/IuSKiD8qacY**
8) **https://youtu.be/Bdqno8bZPGI**

## परिशिष्ट 4 –

सदर नवोपक्रम अंतर्गत **pdf** प्रश्नसंच, उत्तरपत्रिका व **omr sheet** देण्यात आलेल्या लिंक -

1) इयत्ता 5 वी – संख्याज्ञान

   https://drive.google.com/drive/folders/15iM8RLXDXdHzvO2iT4FwUS0EDZ-yZpsB?usp=sharing

2) इयत्ता 5 वी – संख्येवरील क्रिया

   https://drive.google.com/drive/folders/1zd5J_uR-3Kgua73Gi6HsXpEVWqikK6eo?usp=sharing

3) इयत्ता 8 वी – संख्याज्ञान

   https://drive.google.com/drive/folders/156odNdGxUQJO1Nvs1wqXSWJags822gmL?usp=sharing

4) इयत्ता 8 वी – संख्येवरील क्रिया

   https://drive.google.com/drive/folders/1DyfMJTSGcdSL28cZ3RLCHA_-0f0Edv4H?usp=sharing

**परिशिष्ट 5 –**

शिष्यवृत्ती शुक्रवार या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेल्या भाषा व बुद्धीमत्ता चाचणी या विषयाच्या google लिंक ( इयत्ता 5 वी )

1) **https://forms.gle/5GVT2MRG6qMxGC4m6**
2) **https://forms.gle/PVDeoC2R5jJsnQ5y9**
3) **https://forms.gle/9PopFqTD77MuiocG6**
4) **https://forms.gle/pKKLfePcXHY7WTX37**
5) **https://forms.gle/xDDwEgdJ71UrzsLF7**
6) **https://forms.gle/BYCFu8GrmPU2Xqzt9**
7) **https://forms.gle/WerS63P6FKxWrxVu6**
8) **https://forms.gle/2oiuZshSUWTF99uv9**
9) **https://forms.gle/yGipmoDEPFvHVvjD9**
10) **https://forms.gle/R1CkrATSFCRBq5HG8**

**परिशिष्ट 6 –**

शिष्यवृत्ती शुक्रवार या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेल्या भाषा व बुद्धीमत्ता चाचणी या विषयाच्या google लिंक ( इयत्ता 8 वी )

1) https://forms.gle/PUzuzmSav9o5JVaq9
2) https://forms.gle/6mPLGMo7x43rKwN19
3) https://forms.gle/SnzHhKqDhiovgq8T8
4) https://forms.gle/kEYCGsiJ8frBt2B68
5) https://forms.gle/mujxmkrqb9ywXHqr9
6) https://forms.gle/EJrzWpXGn7jS5zmbA
7) https://forms.gle/K8FnUc3YwJ2Rb4ws5
8) https://forms.gle/XrfwiCuBmBeTa2Vo6
9) https://forms.gle/BA2vZTgAbU7bDaYb9
10) https://forms.gle/Y1X8H4disi3kUX1X9

परिशिष्ट 7 –

## नवोपक्रमाची कार्यवाही सुरु असतांनाची क्षणचित्रे






शिष्यवृत्ती शुक्रवार : घटकनिहा...

शिष्यवृत्ती शुक्रवार : घटकनिहाय सराव पेपर संच क्र. 22 इयत्ता 5 वी विषय - गणित

Total points 20/20

घटक – भूमिती
उपघटक – त्रिकोण, चौरस, आयत
एकूण गुण - 20
सूचना - मुलांनो दिलेले प्रश्न समजपुर्वक वाचा व योग्य उत्तराच्या पर्यायाला क्लिक करा.

विद्यार्थ्यांचे नाव *

Rudra. Ganesh. Kajale

Add this page to the home screen? Add


शिष्यवृत्ती शुक्रवार : घटकनिहाय सराव...

शिष्यवृत्ती शुक्रवार : घटकनिहाय सराव पेपर संच क्र. 22 इयत्ता 5 वी विषय - गणित

Total points 20/20


घटक – भूमिती
उपघटक – त्रिकोण, चौरस, आयत
एकूण गुण - 20
सूचना - मुलांनो दिलेले प्रश्न समजपुर्वक वाचा व योग्य उत्तराच्या पर्यायाला क्लिक करा.

विद्यार्थ्यांचे नाव *

Archana Singh

शाळेचे नाव *

P, d, Upadhyay primary school


शिष्यवृत्ती शुक्रवार : घटक निहा...

विषय- बुद्धिमत्ता चाचणी

Total points 18/20

घटक - क्रम ओळखणे , उपघटक - चुकीचे पद ओळखणे
प्रश्न संख्या - 10 , एकूण गुण – 20
सूचना - मुलांनो, दिलेले प्रश्न समजपूर्वक वाचा व त्यावर आधारीत प्रश्नांच्या योग्य उत्तराच्या पर्यालाला क्लिक करा.


विद्यार्थ्यांचे नाव *

Kashish Dipak Ramteke

शाळेचे नाव *

Z.p.u.p.school dewada

तालुक्याचे नाव *


शिष्यवृत्ती शुक्रवार : Topicwi...

शिष्यवृत्ती परीक्षा सराव अंतर्गत
शिष्यवृत्ती शुक्रवार उपक्रम

शिष्यवृत्ती शुक्रवार : Topicwise model test paper 7 Standard 5th Subject - Maths

Total points 18/20

Topic - Number works
Total question - 10 Total Marks - 20
Instruction - Read carefully the question and tick the correct options.

Name of Student *

Kashish Dipak Ramteke


परिमाण

